दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ


Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

बीड महाराष्ट्र | रविवार ,15 मार्च 2026 | | अंक क्र. 295 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4







## चांदापूर येथे मंत्री संजय सिरसाट, आ. धनंजय मुंडे व लोकनेते प्रा. टी. पी. मुंडे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत आज प्रति शिर्डी श्री.साईबाबामुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्याचे आयोजन

# चांदापूर येथे आरोग्य भवानी – डोंगरतुकाई मंदिर परिसरात गित्ते परिवाराच्या पुढाकारातून उभे राहिले प्रति शिर्डी भव्य श्री साईबाबा मंदिर

### स्व . केशवराव बाबाजी गिते यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त अर्धाकृती पुतळ्याचे होणार अनावरण

### भव्य दिव्य सोहळ्यास पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे– रामराव गित्ते, रवींद्र (पापा) गित्ते, भरत गित्ते व ह .भ .प . गुरुवर्य श्री . प्रभाकर (नाना) महाराज झोलकर

परळी वैद्यनाथ | प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ नगरीत उभारण्यात आलेल्या भव्य दिव्य प्रति शिर्डी श्री साईबाबा मंदिराच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले तसेच श्री साईंबाबा मंदिर परिसरात स्व. केशवराव बाबाजी गिते यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण सोहळाचे आयोजित करण्यात आले आहे.तरी परळी वैजनाथ तालुक्यातील व पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रामराव केशवराव गिते, रविंद्र (पप्पा) केशवराव गिते, भरत केशवराव गिते तसेच ह.भ.प. गुरुवर्य श्री. प्रभाकर (नाना) महाराज झोलकर यांनी केले आहे.

चांदापूर येथे श्री. साईबाबामुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण अनावरण सोहळ्याचे रविवारी दि. १५ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना.संजयजी सिरसाट यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी कृषी मंत्री आ.धनंजय पंडितराव मुंडे हे राहणार आहेत. तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा. खा. भागवत कराड (मा.राज्यमंत्री, अर्थ मंत्रालय, भारत सरकार), समीर राजुरकर (महापौर, छत्रपती संभाजीनगर), प्रा.







टी. पी. मुंडे सर (संपर्क प्रमुख, शिवसेना बीड), दिनेश कारागल (जैन), अनिल जगताप, सचिन मुळूक, मा. सौ. पद्मश्री बाजीराव (भैय्या) धर्माधिकारी व परळी वैजनाथ नगर परिषदेचे पाणी पुरवठा सभापती सौ. जयश्री रविंद्र (पप्पा) गिते-मुंडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या निमित्ताने ह.भ.प. श्री. ज्ञानेश्वरभक्त अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे दुपारी १ ते २ या वेळेत कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. पुतळ्याचे अनावरण दुपारी १२.४५ वाजता होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

परळी वैजनाथ तालुक्यातील चांदापूर येथे आरोग्य भवानी – डोंगरतुकाई मंदिर परिसरात गित्ते परिवाराच्या वतीने भव्य दिव्य प्रति शिर्डी मंदिर म्हणून ओळखळल्या जाणाऱ्या श्री साईबाबा मंदिर साकारण्यात आले आहे. परळी वैद्यनाथ नगरीत श्री साईबाबांच्या पावन मूर्तीचे "ओम साईराम... ओम साईराम..." या जयघोषाने संपूर्ण वैद्यनाथ नगरी दुमदुमून गेली. श्री साईबाबांच्या मूर्तीचे शहरातील प्रमुख मार्गांवरून शोभायात्रा व नगर प्रदीक्षणा काढून मूर्तीचे भक्तिमय वातावरणात भव्य आगमन झाले.

परळी वैद्यनाथ शहरापासून बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथांच्या पावन नगरीपासून काही अंतरावर निसर्गाचे वरदान लाभलेल्या परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे चांदापूर येथे आरोग्य भवानी – डोंगरतुकाई मंदिर परिसरात गित्ते परिवाराच्या वतीने भव्य श्री साईबाबा मंदिर साकारण्यात येत आहे. या मंदिरासाठी जयपूर येथील सुप्रसिद्ध मूर्तीकार पांडे यांच्याकडून अत्यंत देखणी, मनमोहक व आकर्षक संगमरवरी श्री साईबाबांची मूर्ती साकारण्यात आली आहे. येत्या १५ मार्च रोजी या मूर्तीची विधीवत प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होणार असून पंचक्रोशीतील भाविकांना 'श्रद्धा आणि सबुरी'चा संदेश देणाऱ्या श्री साईबाबांच्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे, अशी माहिती उद्योजक रवींद्र (पापा) गित्ते व परळी वैजनाथ नगर परिषदेचे पाणी पुरवठा सभापती जयश्रीताई रवींद्र गित्ते यांनी दिली.

हा कार्यक्रम श्री साईंबाबा मंदिर डोंगरतुकाई परिसर, चांदापूर येथे होणार असून सर्व भाविकांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक रामराव केशवराव गिते, रविंद्र (पप्पा) केशवराव गिते, भरत केशवराव गिते तसेच ह.भ.प. गुरुवर्य श्री. प्रभाकर (नाना) महाराज झोलकर यांनी केले आहे.

# नॅशनल यूथ फेस्टिव्हलमध्ये सुशील आंबुरे याला सोलो वादनात प्रथम क्रमांक

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

ग्रामीण भागातही अफाट प्रतिभा दडलेली असते याचे उत्तम उदाहरण तालुक्यातील सुशील सुरेश आंबुरे (दादा) याने दाखवून दिले आहे. चेन्नई येथे आयोजित करण्यात आलेल्या नॅशनल यूथ फेस्टिव्हलमधील सोलो वादन राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत त्याने आपल्या कुटुंबासह गावाचा व परिसराचा अभिमान उंचावला आहे.

सुशील आंबुरे सध्या गुजरात राज्यातील वडोदरा येथील Parul University कडून या स्पर्धेत प्रतिनिधित्व करत होता. देशभरातून अनेक अनुभवी व विविध अकादमीमध्ये प्रशिक्षण घेतलेले स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. अशा मातब्बर स्पर्धकांमध्ये ग्रामीण भागातून आलेल्या सुशीलने आपल्या उत्कृष्ट मृदुंग वादनाच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावला.

या यशामागे सुशीलची मेहनत जितकी महत्त्वाची आहे, तितकीच मोठी भूमिका त्याचे वडील सुरेश आंबुरे (मामा) यांची आहे. परिसरात एक उत्कृष्ट मृदुंग वादक म्हणून त्यांची ओळख आहे. "आई-वडील हेच आपले पहिले गुरू



असतात" या उक्तीप्रमाणे सुरेश मामांनी स्वतःच्या मार्गदर्शनातून सुशीलला घडवले. कोणत्याही मोठ्या अकादमीत न पाठवता त्यांनी घरीच ताल, लय, साधना आणि वादनातील बारकावे शिकवत त्याला प्रगल्भ केले.

लहानपणापासूनच घरात भजन-कीर्तनाची परंपरा असल्याने संगीताचे वातावरण लाभलेल्या सुशीलला वादनाची आवड निर्माण झाली. सातत्यपूर्ण सराव, वडिलांचे मार्गदर्शन आणि कलेवरील प्रेम यामुळे त्याच्या मृदुंग, तबला व ढोलकी वादनाला विशेष ओळख मिळाली आहे.

सुशील आंबुरे याचे हे यश केवळ एका विद्यार्थ्याचे नसून वडिलांच्या समर्पित प्रयत्नांचे आणि ग्रामीण संस्कृतीतील कलेच्या परंपरेचे प्रतीक असल्याची भावना व्यक्त होत आहे.









# सुरेश झांजे यांनी वाढदिवसाचा वायफट खर्च टाळून शाळेला केली आर्थिक मदत

**प्रतिनिधी - सोपान पगारे**

**वाहिरा येथील सुरेश झांजे यांनी आदर्श उपक्रम सुरू केला आहे. वाहिरा व झांजे वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी आर्थिक स्वरूपात मदत केली त्यांचा आसा उपक्रम अतिशय चांगला आहे वायफट खर्च टाळून शाळेच्या विकासाठी मदत केली त्यांच हे काम पाहून गावातील जनतेने व शाळेतील विध्यार्थी व शिक्षकांनी सुरेश झांजे यांचे कौतुक केले व यावेळी बोलताना शाळेचे मुख्यध्यापक सत्यवान लगड यांनी सांगितले सुरेश झांजे यांनी ईतर खर्च टाळून हा निर्णय घेतला अतिशय चांगला निर्णय आहे सर्वांनी यांचा आदर्श घ्यावा व वाढदिवसासाठी आपला इतर खर्च होणारा दुसरीकडे न करता त्यातून आशे चांगले कार्य करावे असे त्यांनी सांगितले, यावेळी वाहिरा गावचे विद्यमान सरपंच संभाजी गाडे, युवा कार्यकर्ते अमोल झांजे , माजी ग्रामपंचायत सदस्य नितीन झांजे, युवा उद्योजक महेश झांजे, शिक्षक स्टाप व, सर्व विद्यार्थी वर्ग उपस्थित होता, शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी सुरेश झांजे, यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दि ल्या.**

# विदर्भस्तरीय मंचावर साहिल रामटेके सन्मानित

## उत्कृष्ट पत्रकारितेसाठी साहिल रामटेके यांचा गौरव!



**भंडारा प्रतिनिधी**

भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील मौजा विर्शी येथे १० व ११ मार्च रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विर्शी येथे आयोजित करण्यात आलेल्या विदर्भ स्तरीय लोककला महोत्सवात 'दै. लोकवतन' वृत्तपत्राचे मुख्य संपादक साहिल रामटेके यांना उत्कृष्ट पत्रकारितेबद्दल सन्मानित करण्यात आले. प्रबोधनकार स्व. मनोज भाऊ कोटांगले यांच्या स्मृतीपित्यर्थ आयोजित या महोत्सवात सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या त्यांच्या निर्भीड लेखणीची दखल घेत त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात युवा प्रबोधनकार भावेश कोटांगले यांच्या हस्ते तसेच उपस्थित प्रमुख मान्यवरांच्या हस्ते साहिल रामटेके यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्न, लोकहिताच्या समस्या आणि प्रशासनाचे दुर्लक्ष यावर सातत्याने प्रकाश टाकत जनतेचा आवाज बुलंद करणाऱ्या त्यांच्या कार्याचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

तसेच जनसागर कला साहित्य बहुउद्देशीय संस्था, साकोली यांच्या वतीनेही साहिल रामटेके यांना उत्कृष्ट पत्रकारितेसाठी सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत पत्रकारितेच्या माध्यमातून लोकजागृती घडवून आणणाऱ्या त्यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाला समाज कल्याण सभापती शितलताई राऊत, पद्मश्री पुरस्कार प्राप्त डॉ. परशुरामजी खुणे, सिने-नाट्य अभिनेता शेखर पटले, सामाजिक चळवळीचे नेते परमानंद मेश्राम, जनजागरण कला साहित्य बहुउद्देशीय संस्था साकोलीचे अध्यक्ष भावेश कोटांगले तसेच अन्य मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्यासाठी पत्रकारितेचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर प्रकाश टाकणारी निर्भीड पत्रकारिता ही लोकशाहीची खरी ताकद असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच लोकहितासाठी कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

विदर्भ स्तरीय लोककला महोत्सवात दोन दिवस विविध लोककला प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. पारंपरिक कला, सांस्कृतिक कार्यक्रम, समाजप्रबोधनपर सादरीकरणे यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. या महोत्सवात विदर्भातील विविध भागांतून आलेल्या कलाकारांनी आपल्या कलेचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाला परिसरातील गावकरी, माता-पालक, महिला भगिनी, युवक-युवती तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सन्मानामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांनी साहिल रामटेके यांचे अभिनंदन केले.

# गाढे पिंपळगावात विज वितरण कंपनीचा सावळा गोंधळ

## वसुलीसाठी दिवसभर वीजपुरवठा बंद, गावकऱ्यांचा संताप

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथे विज वितरण कंपनीने थकबाकी वसुलीसाठी संपूर्ण गावाचा दिवसभर वीजपुरवठा बंद केल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. ज्यांनी नियमितपणे विज बिल भरले आहे त्यांनाही दिवसभर अंधारात बसावे लागल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावातील काही ग्राहकांकडे वीज बिलाची थकबाकी असली तरी त्यासाठी संपूर्ण गावाचा वीजपुरवठा बंद करणे अन्यायकारक आहे. ज्यांची थकबाकी आहे त्यांच्या कनेक्शनवरच कारवाई करावी, असा ग्रामस्थांचा आग्रह आहे.वीजपुरवठा दिवसभर खंडित राहिल्यामुळे घरगुती कामे, शेतातील मोटारी, तसेच लहान व्यावसायिकांचे कामकाज ठप्प झाले. विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसात वीज नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. "आधीच गावाला कमी वेळ वीज मिळते, त्यातही अशा पद्धतीने संपूर्ण गावाचा पुरवठा बंद केल्यास वसुली कशी होणार?" असा सवाल गावकऱ्यांनी उपस्थित केला आहे. वीज वितरण कंपनीने थकबाकीदारांवरच कारवाई करावी आणि नियमित बिल भरणाऱ्या ग्राहकांना त्रास देऊ नये, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, या प्रकाराबाबत वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी योग्य ती दखल घेऊन पुढील काळात अशी घटना घडू नये, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# अंबाजोगाईत स्वामी समर्थ वस्ती, माळी नगर, LIC कॉलनीत हिंदू संमेलन संपन्न

**अंबाजोगाई :** शहरातील स्वामी समर्थ वस्ती, माळी नगर आणि LIC कॉलनी परिसरात आज हिंदू संमेलन उत्साहात पार पडले. या संमेलनात परिसरातील महिला, पुरुष तसेच बालगोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून संघ प्रचारक हरीश कुलकर्णी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच अंबाजोगाई जिल्हा कार्यवाह विपीनजी क्षीरसागर यांनीही हिंदू समाज संघटन, संस्कार आणि सामाजिक एकात्मतेबाबत विचार मांडले. संमेलनात हभप अंबादास महाराज चिक्षे, अमोल महाराज घोडके, संजय महाराज अंकुलवार, विनयजी राजगुरू सर, वांगे सर, चौरे सर, ठाकूर सर, वर्षाताई मुंडे, काळे मॅडम, अंजली ढाकणे, वृंदावणी तांदळे, बाळासाहेब मुंडे, कृष्णा वाघमारे, गोविंद तांदळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमात समाजातील एकता, संस्कृतीचे जतन आणि युवकांनी सामाजिक कार्यात पुढाकार घ्यावा, असा संदेश मान्यवरांनी दिला.



# लोकार्थ

## ग्राहक दिनी एअरटेलचे ग्राहकांच्या समस्या सोडवण्यावर लक्ष

एअरटेल यांनी आपली ग्राहक दिन 2026, ही संस्थेमधील एक व्यापक मोहीम चिन्हित केली जी ग्राहकांच्या समस्या समजून घेणे आणि सातत्याने आपल्या वितरण अनुभवात सुधारणा करण्यावर केंद्रित आहे. नेतृत्व टीमपासून ते कार्यविषयक तज्ञांपर्यंत जवळपास सुमारे वीस हजार एअरटेल कर्मचारी त्यांच्या कार्यालयांमधून बाहेर आले आणि क्षेत्रामध्ये आघाडीच्या टीमसह काम करून ग्राहकांसह थेट संपर्क साधण्यासाठी, क्षेत्र अभियंत्यांसोबत घरे आणि दुकानांना भेटी देऊन, आणि रिटेल तसेच सेवा केंद्रांसह परस्पर संवाद साधून सर्वात महत्वाच्या समस्यांविषयी प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी कार्यरत झाले. एअरटेल मधील ग्राहक दिन म्हणजे संस्थेसाठी आत्मपरीक्षण करण्यासाठी आणि स्वतःला एक साधा परंतु अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारण्यासाठी एक हेतुपुरस्सर घेतलेला विराम ठरतो: आपण आपल्या ग्राहकांसाठी अधिक काय करू शकतो?

उपक्रमावर टिप्पणी करताना, शाश्वत शर्मा, व्यवस्थापकीय संचालक आणि CEO, एअरटेल इंडिया, म्हणाले: "ग्राहक दिन हा आम्हाला ग्राहकांचे म्हणणे सखोलतेने ऐकून घेण्याच्या, स्वतःला आव्हान देण्याच्या आणि तत्परतेने कृती करण्याच्या आमच्या जबाबदारीची महत्वाची आठवण करून देतो. हा दिन ग्राहकांच्या समस्या सोडविणे, ग्राहक अनुभव सुलभ बनवणे आणि आमच्या लाखो ग्राहकांना दररोज वितरित केल्या जाणाऱ्या सेवेचा दर्जा सातत्याने उंचावण्यासाठी आमची वचनबद्धता अधिक बळकट करतो."



## जीएसपी क्रॉप सायन्सचा आयपीओ आजपासून खुला होणार

गुजरातस्थित जीएसपी क्रॉप सायन्स लिमिटेडने आपल्या पहिल्या सार्वजनिक समभाग विक्रीसाठी (आयपीओ) १० रुपये दर्शनी मूल्य असलेल्या प्रति इक्विटी शेअरसाठी ३०४ ते ३२० रुपयांचा किंमतपट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा हा आयपीओ गुंतवणुकीसाठी सोमवार, १६ मार्च २०२६ रोजी खुला होईल आणि बुधवार, १८ मार्च २०२६ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान बोली (Lot Size) किमान ४६ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ४६ च्या पटीत बोली लावू शकतात. हा आयपीओ २४० कोटी रुपयांचा नवीन इश्यू आणि प्रवर्तकांद्वारे (विलासबेन व्रजमोहन शाह, भावेश व्रजमोहन शाह आणि कप्पा ट्रस्ट) ५०,००,००० शेअर्सची विक्री यांचा समावेश आहे. नवीन इश्यूमधून मिळणाऱ्या १७० कोटी रुपयांचा वापर कंपनीवरील थकीत कर्जाची परतफेड किंवा अंशतः परतफेड करण्यासाठी आणि सामान्य कॉर्पोरेट हेतूंसाठी केला जाईल.जीएसपी क्रॉप सायन्स ही एक संशोधन-आधारित कृषी-रसायन कंपनी आहे. ४० वर्षांहून अधिक अनुभव असलेली ही कंपनी भारतातील कीटकनाशके, तणनाशके, बुरशीनाशके आणि वनस्पती वाढ नियंत्रकांच्या विकास आणि उत्पादनात विशेष प्राविण्य राखते. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत, कंपनीकडे उत्पादित कृषी-रसायनांसाठी ५२४ नोंदणी आहेत.

## वर्ल्ड ट्रेड सेंटर द्वारा भारत-कॅनडा व्यापारी संबंधांच्या पुनर्रचनेची नांदी

भारत आणि कॅनडा यांच्यातील आर्थिक संबंधांना पुन्हा चालना देण्याच्या नव्या प्रयत्नांचे संकेत देत, 'वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई'ने 'ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज'च्या सहयोगाने 'सेंट्रम हॉल' येथे एका व्यापारी गोलमेज परिषदेचे आयोजन केले. या परिषदेत 'इंडो-कॅनेडियन चेंबर ऑफ कॉमर्स'च्या नेतृत्वाखालील कॅनेडियन व्यापारी शिष्टमंडळाने सहभाग घेतला.कॅनडाच्या महावाणिज्य दूतावासाचे वरिष्ठ व्यापार आयुक्त आणि वाणिज्यदूत श्री. अँड्र्यू महाराज यांनी सांगितले की, भारत-कॅनडा संबंध आता अशा एका टप्प्यात प्रवेश करत आहेत, ज्याचे वर्णन त्यांनी "पुनर्रचना आणि गतीवर्धनाचा टप्पा" असे केले आहे. त्यांनी नमूद केले की, दोन्ही देश आता त्यांच्या आर्थिक संबंधांमधील गती पुन्हा वाढवण्याच्या दिशेने पाहत आहेत आणि २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार सुमारे ७० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत नेण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे.कॅनडाचे पंतप्रधान श्री. मार्क कार्नी आणि भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्यात अलीकडेच झालेल्या चर्चांचा संदर्भ देत, श्री. महाराज म्हणाले की, प्रस्तावित 'व्यापक आर्थिक भागीदारी करार') हा दोन्ही देशांमधील व्यापार आणि गुंतवणुकीचा विस्तार करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण आराखडा ठरू शकतो.

## स्विगी आणि एचडीएफसीची दोन नवीन को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड्स

स्विगी, जी भारतातील एक अग्रेसर सुविधेनुसार डिलीव्हरी सेवा आहे, आणि HDFC बँक, जी भारतातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील बँक आहे, यांनी त्यांच्या एकत्रित क्रेडिट कार्ड पोर्टफोलिओच्या विस्ताराची घोषणा केली आहे, ज्यात दोन नवीन प्रकार आहेत: स्विगी BLCK एचडीएफसी बँक क्रेडिट कार्ड आणि स्वॅगी Ornge HDFC बँक क्रेडिट कार्ड.




हे नवीन कार्ड आधुनिक ग्राहकांच्या जीवनशैलीत सहज सुविधा देण्यासाठी बनवण्यात आली आहेत. जेवण मागवणे आणि क्विक कॉमर्स पासून ते हॉटेलमध्ये जेवणे, शॉपिंग आणि प्रवासापर्यंतच्या रोजच्या वारंवार होणाऱ्या खर्चावर हे कार्ड उत्तम मूल्य आणि जास्तीत जास्त रीवाड्र्स मिळवून देतात. स्विगी HDFC बँक क्रेडिट कार्डचे सध्याचे वापरकर्ते स्विगी आणि क्लिअरट्रिप, नायका, पेटीएम ट्रॅव्हल, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट आणि मिंत्रा यांसारख्या 30+ पेक्षा जास्त आघाडीच्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर भरघोस कॅशबॅकचे फायदे घेत राहतील. 2023 मधील पहिल्या यशस्वी प्रस्तुतीचा पाया पुढे नेत, आता नवीन आणि जुन्या अशा दोन्ही कार्ड धारकांना अधिक प्रगत प्रवास आणि जीवनशैली फायद्यांचा लाभ घेता येईल. यामध्ये आघाडीच्या भागीदार प्लॅटफॉर्मवर तात्काळ सवलत आणि अतिरिक्त कॅशबॅकचा समावेश आहे, जसे की: क्लिअरट्रिप: हॉटेल बुकिंगसाठी फ्लॅट 19% सूट + 5% कॅशबॅक, विमान तिकिटांसाठी सरळ 6% सूट + 5% कॅशबॅक, आणि सर्व नायका ॲप्सवर सरळ 5% सूट + 5% कॅशबॅक.

**संकलन - संयोजनः सुबोध रणशेवरे**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# प्रत्येक तालुक्यात किमान एक तरी रेशीमयुक्त गाव निर्माण व्हावे ; रेशीम शेतीतून निश्चितपणे शेतकरी समृद्ध होईल

## रेशीम शेतकरी व रेशीम धागा उद्योजक मेळाव्यात जिपचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ

**लातूर |** शेतकरी समृद्ध झाला पाहिजे, आर्थिक क्षमता वाढली पाहिजे, नागरिकांचे स्थलांतर थांबले पाहिजे यासाठी रुढीपारंपारिक शेतीतून बाहेर पडून शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळणे गरजेचे असून प्रत्येक तालुक्यात किमान एक तरी रेशीमयुक्त गाव निर्माण व्हावे रेशीम क्लस्टर व्हावे यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी दिली.

केंद्रीय रेशीम तांत्रिक सेवा केंद्र धारवाड, जिल्हा रेशीम विकास विभाग आणि कौशल्या सिल्क रेलिंग यांच्या वतीने रेशीम शेतकरी व रेशीम धागा उद्योजक मेळावा कौशल्या सिल्क रेलिंगचे संचालक ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी संपन्न झाला याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब वाघ, धारवाड येथील केंद्रीय रेशीम मंडळाचे शास्त्रज्ञ डॉ. विराज सोमकुंवर, लातूर जिल्हा रेशीम विकास अधिकारी श्री. एस. बी. वराट, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प विकास अधिकारी जयसिंग जगधने, गेवराई तालुक्यातील रुई येथील आदर्श सरपंच कालिदास नवले, रेणापूर पंस उपसभापती शरद दरेकर, सेवानिवृत्त रेशीम विकास अधिकारी नरसिंग बावणे, सुरज शिंदे, राजकिरण साठे यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.





रेशीम शेती वाढली पाहिजे याकरिता शासनाच्या वतीने विविध योजना राबविण्यात येत असून याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे सांगून वाघ म्हणाले की, रेशीम उद्योगातून शेतकरी समृद्ध होईल पर्यायाने गाव समृद्ध झाले तर जिल्हा समृद्ध होईल असेही त्यांनी बोलून दाखवले. रेशीम उद्योगात आणि धागा निर्मिती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या प्रगतशील शेतकऱ्यांचा आणि उद्योजकांचा प्रमाणपत्र देऊन त्याचबरोबर धागा प्रक्रिया प्रशिक्षण शिबिरातील यशस्वी प्रशिक्षणार्थींचे प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

शेतीकडे कष्टाचे काम म्हणून पाहिले जाते मात्र उद्योग म्हणून पाहिला जात नाही हे दुर्दैवी असल्याचे सांगून ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, ऊस, सोयाबीन, कापूस यापेक्षा अधिक फायदा रेशीम शेतीत आहे. ऊसासाठी कारखान्यावर हेलपाटे मारावे लागतात मात्र रेशीम शेती केल्यास धागा उत्पादक कंपन्या शेतकऱ्यांच्या दारात येऊन कोष घेऊन जातात. शेतकऱ्याला शेतकरी भेटल्याशिवाय कशात फायदा आहे हे समजत नाही याकरिता लातूर ग्रामीण मधील सरपंच लोकप्रतिनिधी यांची रेशीम शेतीसाठी रुई ता. गेवराई येथे निवासी अभ्यास कार्यशाळा घेण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमात रुई येथील आदर्श शेतकरी कालिदास नवले यांनी रेशीम शेतीतून शेतकऱ्याबरोबरच संपूर्ण रुई या गावात नवी क्रांती घडवून आले असल्याची सविस्तर माहिती दिली. प्रारंभी केंद्रीय रेशीम मंडळाचे डॉ. विराज सोमकुंवर यांनी मेळाव्याचे प्रास्ताविक केले तर जिल्हा रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट यांनी रेशीम उद्योगाची तर कृषी विभागाचे जयसिंग जगधने यांनी कृषी विभागाच्या योजनेची माहिती दिली. या मेळाव्यात रेशीम उद्योग शेतकरी निलेश पाटील, सिद्धेश्वर कागले, श्रीराम कोपणार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी रेशीम उद्योग तांत्रिक अधिकारी रोहन देशमुख यांनी आभार मानले. या मेळाव्यात रेशीम शेती आणि रेशीम धागा निर्मिती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या प्रगतशील शेतकऱ्यांचा, उद्योजकांचा त्याचबरोबर धागा प्रक्रिया प्रशिक्षण शिबिरातील यशस्वी शिबिरार्थींचा प्रमाणपत्र देऊन उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

---

# वाढदिवसानिमित्त मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणासाठी योगदान

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी):-**

"कोणत्याही चांगल्या कार्याची सुरुवात स्वतःपासून करावी" या विचाराला कृतीत उतरवत सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर येथील मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची भावना जपत त्यांनी यंदाच्या वाढदिवसानिमित्त "आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जिल्हा परिषद शाळा विकास प्रकल्पा" साठी ₹९,९९९/- इतकी मदत जाहीर केली आहे.

विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडविण्याच्या उद्देशाने उभारण्यात येत असलेल्या या महत्त्वपूर्ण उपक्रमाला त्यांनी स्वतःपासून सुरुवात करून समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे. केवळ आर्थिक मदत देऊन थांबण्याचा त्यांचा विचार नसून या उपक्रमात आणखी योगदान देण्याचाही त्यांचा मानस आहे. तसेच समाजातील सर्व सुजाण नागरिक, मित्रपरिवार, सहकारी आणि शुभेच्छुकांनीही या शैक्षणिक उपक्रमाला हातभार लावावा असे आवाहन त्यांनी केले आहे.



मुख्य अभियंता अतुल चव्हाण हे नेहमीच सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग घेणारे अधिकारी म्हणून ओळखले जातात. विविध योजनांच्या अंमलबजावणीत ते केवळ प्रशासकीय पातळीवर काम न करता प्रत्यक्ष कृतीतून समाजाला प्रेरणा देण्याचा प्रयत्न करतात. आदर्शगाव योजनेअंतर्गत श्रमदानाचे कार्यक्रम असोत किंवा सार्वजनिक स्वच्छतेसाठी राबविण्यात आलेले उपक्रम असोत, त्यांनी स्वतः पुढाकार घेत सहभाग नोंदविला आहे. सार्वजनिक शौचालयांच्या स्वच्छतेसाठी त्यांनी स्वतः हातभार लावत समाजापुढे एक वेगळा आदर्श ठेवला आहे.

गेल्या वर्षीही वाढदिवसानिमित्त त्यांनी एक वेगळा आणि प्रेरणादायी संकल्प केला होता. वाढदिवसाचा होणारा अनावश्यक खर्च टाळून तो निधी गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वापरण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. तसेच आपल्या मित्रपरिवार, सहकारी आणि शुभेच्छुकांना पुष्पगुच्छ किंवा भेटवस्तू देण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी मदत करण्याचे आवाहन त्यांनी केले होते. या आवाहनाला समाजातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमातून जमा झालेला संपूर्ण निधी फुलंब्री येथील श्री संत सावता गुरुकुल विद्यालय येथील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी वापरण्यात आला. या निधीतून सुमारे २५ लाख रुपयांचे २९ संगणक, एक इंटरॅक्टिव्ह बोर्ड, संगणक टेबल आणि इतर आवश्यक साहित्य विद्यालयाला उपलब्ध करून देण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. या साधनांमुळे विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण आणि डिजिटल माध्यमातून शिकण्याची संधी उपलब्ध झाली.

या उपक्रमानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि त्यांच्या डोळ्यांत दिसणारी नवी स्वप्ने हेच या कार्याचे खरे समाधान असल्याचे अतुल चव्हाण यांनी सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना देखील आधुनिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांच्यातील क्षमता विकसित व्हावी यासाठी अशा प्रकारचे उपक्रम अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावर्षीही आपल्या वाढदिवसानिमित्त त्यांनी समाजातील सर्वांना नम्र आवाहन केले आहे की, पुष्पगुच्छ, हार किंवा भेटवस्तू देण्याऐवजी "आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जिल्हा परिषद शाळा विकास प्रकल्पासाठी" यथाशक्ती सहकार्य करावे.

समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या क्षमतेनुसार केलेली छोटीशी मदत देखील एखाद्या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रवासाला नवे बळ देऊ शकते. भविष्यात याच विद्यार्थ्यांमधून डॉक्टर, अभियंते, अधिकारी किंवा समाजासाठी कार्य करणारे जबाबदार नागरिक घडू शकतात, असे त्यांनी सांगितले.

समाजातील सुजाण नागरिकांनी शिक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात एकत्र येऊन काम केल्यास ग्रामीण भागातील शाळांचे चित्र नक्कीच बदलू शकते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. आपल्या वाढदिवसासारख्या वैयक्तिक आनंदाच्या क्षणांना सामाजिक कार्याशी जोडून समाजाला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने केला आहे.

दि. १५ मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण क्षेत्रासाठी योगदान देण्याचा संकल्प केला आहे.

# परळी लोकन्यायालयात प्रकरणे 86 प्रकरणे तडजोडीने निकाली




**परळी वैजनाथ |** परळी तालुका विधी सेवा समिती व परळी वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाणी व फौजदारी तथा विविध बँका पतसंस्था महावितरण इत्यादी संस्था यांचे प्रकरणे सामंजस्याने व तडजोडीने निकाली काढण्यात आली.

दिनांक 14 मार्च 2026 रोजी आयोजित करण्यात आलेल्या या लोक अदालतीत दाखल पूर्व 24 व प्रलंबित प्रकरणे 62 मिळून 86 प्रकरणे निकाली निघाली आणि एकूण रक्कम वसुली 68 लाख 85 हजार 284 रुपयांची बँक पतसंस्था यांची वसुली झाली आहे .सदर लोकन्यायालयात पंच म्हणून परळी न्यायालयाचे न्या डि आर बोर्डे न्या डि वाय रायरीकर ॲड व्हि डी धुमाळ ॲड व्हि एम जगतकर यांनी काम पाहिले.सदर लोक न्यायालय यशस्वी करण्यासाठी न्या परळी वकील संघाचे अध्यक्ष ॲड डि बी कडबाने ॲड आर.व्हि.गित्ते ॲड प्रदिप गिराम ॲड आर व्हि देशमुख ॲड मिर्झा मंजुर अली ॲड.माधवराव मुंडे ॲड वैजनाथ नागरगोजे ॲड दिलीप स्वामी ॲड प्रभाकर सातभाई ॲड वसंतराव फड उपाध्यक्ष ॲड धनाजी कांबळे सचिव ॲड विलास बडे ॲड डि.एल.उजगरे.ॲड

नागापूरकर ॲड जीवनराव देशमुख ॲड गजानन पारेकर ॲड लक्ष्मीकांत मुंडे ॲड मोहन कराड ॲड लक्ष्मण अघाव ॲड कल्याण सटाले ॲड मार्तंड शिंदे ॲड लक्ष्मण गित्ते ॲड आशिष पोतदार ॲड जगन्नाथ आंधळे ॲड दत्ता कराड ॲड ज्ञानोबा मुंडे ॲड ॲड वाय आर सय्यद सुनिल सोनपीर ॲड दिनकर वाघमोडे ॲड संजय डिघोळे ॲड सोपान मुंडे ॲड दत्तात्रय जाधवर ॲड आबा सोळंके ॲड केशव अघाव ॲड शाकेर सय्यद ॲड पुनम पाळवदे सहाय्यक अधीक्षक गिरीधर जोशी हाश्मी गणेश कलशेटे बडगिरे सुंदर मुंडे अमित गजबार कृष्णा कळसदकर सचिन कळसकर जयराम गंगणे ईत्यादी यांनी सहभाग घेतला.

---

# खिलाडू वृत्तीने चांगला समाज व निकोप राष्ट्रनिर्मिती होते – राजकिशोर मोदी

## अंबाजोगाईत 2027 मध्ये भव्य आयपीएल फॅन पार्क उभारण्याचा मानस - अक्षय मुंदडा

## खेळामुळे सांघिक भावना टिकून राहते - पोलीस निरीक्षक शरद जोगदंड

## निरोगी शरीर हे निरोगी मनाचे प्रतीक - डॉ राजेश इंगोले

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

स्व.प्रकाशचंद मुथा यांच्या स्मरणार्थ अंबाजोगाई क्रिकेट अॅकडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य क्रिकेट स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा अंबाजोगाई शहरातील क्रीडाप्रेमी, खेळाडू, पालक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या निमित्ताने क्रीडा संस्कृतीचा प्रसार आणि नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा संदेशही देण्यात आला. कार्यक्रमात बोलताना प्रमुख पाहुणे राजकिशोर मोदी यांनी खेळाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञान युगात मुलांना मैदानावर खेळण्यासाठी प्रवृत्त करणे ही काळाची गरज बनली आहे. अंबाजोगाई शहरातील मुलांना मैदानावर आणून त्यांना योग्य प्रशिक्षण देण्याचे आणि राज्यस्तरावर नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मोहित परमार आणि त्यांच्या सहकारी माही परमार करत आहेत. त्यांच्या अथक परिश्रमामुळे अनेक लहान खेळाडूंना मोठ्या स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळत आहे. ते पुढे म्हणाले की, खेळ हा केवळ मनोरंजनाचा भाग नसून तो जीवनाचा अविभाज्य घटक आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरूस्ती वाढते, मानसिक बळ मिळते आणि जीवनातील यश-अपयश स्वीकारण्याची क्षमता निर्माण होते. क्रिकेट हा खेळ आज राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय असून भारतीय खेळाडूंनी जगभरात आपल्या देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. अंबाजोगाई सारख्या शहरातूनही भविष्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणारे खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. तुम्हाला चांगला नागरिक आणि चांगला माणूस व्हायचे असेल तर आधी चांगला खेळाडू होणे गरजेचे आहे, असे सांगत त्यांनी उपस्थित लहान खेळाडूंना प्रेरणा दिली. त्यांनी स्व.प्रकाशचंद मूथा यांच्या कार्याची आठवण करून देताना सांगितले की, अंबाजोगाई शहरात विविध खेळांसाठी साहित्य सहज उपलब्ध व्हावे यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. शहरातील क्रीडा संस्कृती जपण्यासाठी आणि मुलांना खेळाकडे वळवण्यासाठी त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमात बोलताना अक्षय मुंदडा यांनी अंबाजोगाई शहरासाठी एक महत्त्वाची घोषणा केली. त्यांनी सांगितले की, येत्या काळात अंबाजोगाई मध्ये आयपीएल फॅन पार्क आयोजित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. २०२७ मध्ये अंबाजोगाई शहरात जवळपास वीस हजार प्रेक्षक एकत्र येऊन मोठ्या स्क्रीनवर आयपीएल सामने पाहू शकतील असे भव्य फॅन पार्क आयोजित करण्याचा मानस आहे. यामुळे शहरातील क्रिकेटप्रेमींना




आयपीएलचा थरार एकत्रितपणे अनुभवता येईल, असे त्यांनी सांगितले. यामुळे अंबाजोगाई शहराच्या क्रीडा संस्कृतीला नवे बळ मिळेल तसेच क्रिकेटप्रेमींना मोठ्या प्रमाणावर आनंद घेण्याची संधी मिळेल, असेही त्यांनी नमूद केले. तसेच शहरातील तरूण खेळाडूंनी मेहनत, चिकाटी आणि शिस्त यांचा अवलंब करून आपल्या क्रीडा कारकिर्दीत यश संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी खेळाचे सामाजिक महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले की, खेळ ही अशी गोष्ट आहे जी समाजात सांघिक भावना टिकवून ठेवते आणि लोकांना एकत्र आणण्याचे काम करते. कोणताही खेळ असो, त्यामधून एकमेकांशी सहकार्य करण्याची वृत्ती निर्माण होते आणि टीमवर्कची भावना विकसित होते. आजच्या काळात मुले मोबाईल गेम्समध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतलेली दिसतात, त्यामुळे मैदानावर खेळणाऱ्यांची संख्या कमी होत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्यामुळे मुलांना मैदानावर येऊन खेळण्याची प्रेरणा मिळते आणि त्यांच्या प्रतिभेला योग्य व्यासपीठ उपलब्ध होते. ते पुढे म्हणाले की, अशाच छोट्या अॅकडमीमधून भविष्यात मोठे खेळाडू तयार होतात. रणजी ट्रॉफी, आयपीएल तसेच अंडर-१४, अंडर-१९ आणि भारतीय संघात खेळणारे अनेक खेळाडू अशाच पायाभूत स्तरावरून पुढे आले आहेत. त्यामुळे पालकांनीही आपल्या मुलांना खेळासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. विजेत्या संघाचे अभिनंदन करताना त्यांनी पराभूत संघांनी निराश न होता पुढील स्पर्धांमध्ये अधिक मेहनत घेऊन यश संपादन करण्याचा सल्ला दिला. यावेळी आंबजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी अंबाजोगाईतील क्रिकेटच्या इतिहासात मोहित परमार आणी माही परमार यांच्या अंबाजोगाई क्रिकेट अॅकडमिने एक नवीन आयाम दिला आहे. मोबाईल व टीव्ही मध्ये मग्न झालेली आजची युवापिढी मैदानावर आणण्यासाठी हा क्रीडामंच उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ.इंगोले यांनी परमार क्रीडा प्रशिक्षक दाम्पत्यांचे आभार मानत निरोगी शरीरात निरोगी मन असणे अत्यावश्यक आहे आणि याद्वारे भारत महासता बनू शकते हा आशावाद त्यांनी व्यक्त केला. यावेळी जयकुमार लोढा, अक्षय परदेशी यांचे ही समायोचित मार्गदर्शन झाले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशिक्षक मोहित परमार यांनी केले तर प्रभावी सुत्रसंचालन अशोक तापडे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रभावी शैलीत संपूर्ण कार्यक्रम रंगतदार बनवला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स्पर्धेचे आयोजक निलेश मुथा यांनी केले. या सन्मान सोहळ्यावेळी राजकिशोर मोदी, अक्षय मुंदडा, नगरसेवक संजय गंभीरे, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, निलेश मूथा, डॉ.राजेश इंगोले, प्रेमलता मूथा, अशोक तापडे, अनितोष कातकडे, अविनाश साठे, साहेबां लोंढे, जयकुमार लोढा, सतीश बालुतकर, डॉ.संदीप जैन, अक्षय परदेशी, अभिजित जोधळे, सुरज कांबळे, सचिन भिसे, प्रतीक बोथरा, ऋषभ राका आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने क्रीडाप्रेमी, खेळाडू, पालक आणि नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अंबाजोगाई क्रिकेट अॅकडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा आणि सन्मान सोहळा शहरातील क्रीडा क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरला असून भविष्यात अशा स्पर्धांमुळे अनेक नवोदित खेळाडूंना पुढे येण्याची संधी मिळेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# अशीही बनवा बनवी!

# चक्क एका गाडीचे वेगवेगळे नंबर- प्रशासना बरोबरच बनवाबनवी करण्याचा प्रकार

## अवैध वाळू वाहतूक प्रकरणी हायवा जप्त; बनावट नंबर प्लेटचा डाव उघड

## एकूण 40 लाख 30 हजारांचा मुद्देमाल जप्त; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

## कर्तव्यदक्ष आयपीएस ऋषिकेश शिंदे साहेबांनी याबाबींकडे लक्ष देण्याची होत आहे मागणी

## सिरसाळा मार्गे कनेक्शन अनेक रेतीचे गैरप्रकार आणि अवैध्य धंदे यापूर्वीही समोर आलेले आहेत

**परळी : विशेष बातमीपत्र**

परळी ते अंबाजोगाई रोडवरील कन्हेरवाडी घाट परिसरात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा डंपरवर पोलिसांनी धडक कारवाई करत चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात वाहनावर बनावट नंबर प्लेट लावून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकारही उघडकीस आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नंदनवन हॉटेलजवळील रस्त्यावर भारत बेंज कंपनीचा दहा टायरी हायवा डंपर (मूळ क्रमांक MH-44 BU 6065) अवैधरित्या वाळूची वाहतूक करताना आढळून आला. मात्र वाहनावर मूळ क्रमांकातील '6065' ऐवजी '5065' असा बनावट नंबर तयार करून पोलिसांना चकवा देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

या प्रकरणी चालक अविनाश श्रीकिशन घरत (वय ३५, रा. जवळबन, ता. केज, जि. बीड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी अंदाजे ४० लाख रुपये किमतीचा हायवा डंपर तसेच ५ ब्रास अवैध वाळू (सुमारे ३० हजार रुपये) असा एकूण ४० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दरम्यान, अवैध वाळू वाहतूक करणारे माफिया पोलिसांना चकवा देण्यासाठी विविध शक्कल लढवत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. कधी वाहनांच्या नंबर प्लेटवर चिखल लावणे, नंबर अर्धवट झाकणे किंवा बनावट नंबर तयार करणे अशा पद्धतींचा वापर करून कारवाईपासून बचाव करण्याचा प्रयत्न केला जातो. या कारवाईतही तसाच प्रकार उघड झाल्याने परिसरात चर्चेला उधाण आले आहे.









- गाडी पकडली तेव्हा वेगळा नंबर, तक्रार दाखल झाली तेव्हा वेगळा नंबर, एका दिवसानंतर परत गाडीचा वेगळाच नंबर त्यामुळेच अशी ही बनवाबनवी असा प्रकार पाहायला मिळाला.
- अनेक वेळा अनेक प्रकारचे माफिया आपल्या गाड्यांना चुकीचा नंबर टाकून काही वेळा नंबरच्या ठिकाणी चिखल लावून काही वेळा नंबर खोडून अशा नामी शक्कल लढवत असतात. त्याचाच एक भाग परळी येथील आयपीएस ऋषिकेश शिंदे यांच्या पथकाने पकडलेल्या गाडीदरम्यान पाहायला मिळाला.
- विशेष म्हणजे सदरील गाडी ही ग्रामीण पोलीस स्टेशन मध्ये असताना सुद्धा हे नंबर कसे बदलण्यात आले याबद्दल तर्कवितर्क वर्तविले जात आहेत.

### अधिकारी गाडीत असल्याचे सांगून कर्मचारी करत होते वसुली !

मागे काही दिवसापूर्वी एक व्हिडिओ व्हायरल झाला होता ज्यामध्ये रात्रीच्या वेळी गाडीमध्ये तहसीलदार आहेत अधिकारी आहेत असे सांगून काही कर्मचारी अंगावर शॉल घेऊन गाड्यांकडून वसुली करत असल्याचा व्हिडिओ आणि त्यानंतर थेट ज्यांच्याकडून ही रात्रीच्या वेळी व वसुली केली त्यांनी दिलेली प्रतिक्रिया आणि संपूर्ण वर्णन याविषयीचा व्हिडिओ सोशल मीडियावर बराच चर्चिला जात होता.

**या पार्श्वभूमीवर दबंग आणि डॅशिंग अधिकारी म्हणून ओळखले जाणारे आयपीएस ऋषिकेश शिंदे यांनी अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी अधिक कठोर पावले उचलावीत, तसेच अवैध वाळू माफियांना आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या घटकांवर कडक कारवाई करावी, अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त होत आहे.**

# सुरत चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग भूसंपादन प्रकरणी शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य मोबदला देण्यासाठी प्रयत्न करणार : आ.सुरेश धस



**आष्टी ( प्रतिनिधी)**

सुरत ते चेन्नई हा राष्ट्रीय ग्रीन फिल्ड महामार्ग आष्टी तालुक्यातील 19 गावांमधून जात असून या महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या बहुमोल किमतीच्या जमिनी भूसंपादित करण्यात येणार असल्याने या संपादित जमिनींवरील फळबागा, वृक्ष लागवड, घरांचे बांधकाम, पत्रांचे शेड्स, विहिरी खोदकाम या सर्व संपत्तीचे मूल्यमापन योग्य पद्धतीने करून शेतकऱ्यांना महामार्ग प्राधिकरणाने जमिनीचा योग्य मोबदला देण्यात यावा यासाठी आपण जिल्हाधिकारी बीड यांच्याशी आणि आवश्यकता वाटल्यास वरिष्ठ अधिकारी यांच्याशी चर्चा करणार आहोत अशी माहिती आमदार सुरेश धस यांनी याबाबतच्या प्रशासन आणि संबंधित शेतकरी त्यांचे संयुक्त बैठकीमध्ये बोलताना दिली

आज या महत्वपूर्ण विषयाच्या बैठकीसाठी पाटोदा विभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख आणि राष्ट्रीय महामार्ग जीवन प्राधिकरण विभागाचे अधिकारी आणि नायब तहसीलदार पांडुरंग माढेकर नायब तहसीलदार आणि 19 गावातील संबंधित शेतकरी हे उपस्थित होते

आष्टी तालुक्यातील नांदूर ते पारगाव जोगेश्वरी या दरम्यानच्या 19 गावांमधून हा राष्ट्रीय ग्रीनफिल्ड महामार्ग जात असून सुमारे 38 किलोमीटर अंतराचा असून त्यासाठी 200 ते 225 हेक्टर्स जमिनीचे भूसंपादन करण्यात येणार आहे या महामार्गाचे ऑगस्ट 20 22 मध्ये ड्रोन सर्वेक्षण झाले त्यानंतर सप्टेंबर 23 मध्ये नोटिफिकेशन प्रकाशित होण्याच्या दरम्यान या महामार्गावरील असेट्स मध्ये वाढ झाली आहे असा दावा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण केला असताना संबंधित गावातील शेतकऱ्यांनी सर्वेक्षण करताना अनेक ठिकाणी चुका झाल्या असून फळबागांचे मोघम स्वरूपात मूल्यांकन करण्यात आले असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे असे प्रतिपादन शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आले भूसंपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या मूल्यांकनाबाबत उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने सहानुभूतीने विचार करण्यात येणार असून रेडी रेकनर सह प्रचलित मूल्यदर याचा देखील विचार होणार असून शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याविषयी सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले यावेळी राष्ट्रीय ग्रीनफिल्ड महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकल्पासाठी जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेतला नसला तरीही शेतकऱ्यांना आतापर्यंतचे व्याज देण्याचा प्राधिकरणाचा विचार असल्याचे सांगितले आष्टी तालुक्यातील नांदूर, बाळेवाडी, कुंबेफळ, खुंटेफळ, पुंडी, शिरापूर, निमगाव चोभा,धिर्डी, केळसांगवी, खानापूर चिखली वाळुंज पारगाव जोगेश्वरी या गावातील शेतकऱ्यांनी आपापली निवेदने सादर केली असून त्यावर सारासार विचार करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला घेण्याबाबत आपण जिल्हाधिकारी बीड यांचे पासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत चर्चा करून असे आश्वासन आ. सुरेश धस यांनी या गावातील शेतकऱ्यांना यावेळी दिले

# विद्यार्थ्यांनी दररोज सकाळी वीस मिनिटे हलका व्यायाम करावा : डॉ श्रीनिवास रेड्डी

## विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी वाचनाचा सराव वाढवावा : श्री सुदर्शन रापतवार

## शिक्षक मैत्री प्रतिष्ठान आयोजित सामान्य ज्ञान परीक्षा 2026 चे बक्षीस वितरण संपन्न







**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई च्या वतीने प्रतिवर्षी घेण्यात येणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षा 2026 वर्ष 4थे या स्पर्धेचे बक्षीस वितरण संकल्प विद्यालय अंबाजोगाई येथे संपन्न झाले.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार माध्यम न्यूज चे संपादक श्री सुदर्शन रापतवार तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ श्रीनिवास रेड्डी, संकल्प विद्यालयाचे सर्वेसर्वा प्रा.कैलास चोले नगरसेवक आकाश भैय्या कराड इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री विजय रापतवार यांनी करताना या सामान्य ज्ञान परीक्षेच्या मागचा हेतू सांगितला.

यावेळी प्रमुख पाहुणे डॉ श्रीनिवास रेड्डी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी आपला अभ्यास चांगला व्हावा यासाठी आपण निरोगी व सुदृढ असले पाहिजे याकरिता आपण दररोज 20 मिनिटे हलका व्यायाम करावा व दररोज एक तरी सफरचंद खावे जेणे करून आपल्या शरीराचे पोषण चांगल्या प्रकारे होईल, याबरोबरच आपला अभ्यास सुद्धा आपण नियमित करावा व या स्पर्धेच्या युगामध्ये स्वतःला ज्ञानाच्या बाबतीत परिपूर्ण करावे असे सांगितले.

यावेळी प्रा कैलास चोले यांनी सदरील सामान्य ज्ञान परीक्षा शिक्षक मैत्री प्रतिष्ठानच्या वतीने अतिशय उत्कृष्ट रित्या व स्पर्धा परीक्षेच्या तोडीस तोड पद्धतीने घेण्यात येते व यामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा मोठ्या प्रमाणावर सहभागी होतात. या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जरी बक्षीस मिळाले नाही तरी विद्यार्थी राष्ट्र पुरुषांच्या जीवन कार्याची माहिती घेतात त्यामुळे त्यांना त्यांच्या कार्याविषयी माहिती प्राप्त होते असे सांगून स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घ्यावी असे सांगितले.

शेवटी अध्यक्षीय समारोप करताना श्री सुदर्शन रापतवार यांनी विद्यार्थ्यांना पुढे चालून खूप साऱ्या स्पर्धा परीक्षांना सामोरे जायचे असेल तर आता पासूनच अशा प्रकारच्या स्पर्धा परीक्षेमध्ये सहभाग घ्यावा व आपल्या वाचनाचा सराव वाढवावा जेणेकरून आपणास खूप सारे ज्ञान मिळेल असे सांगितले.

शेवटी शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे सचिव श्री विष्णू सरवदे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

या स्पर्धेमध्ये इयत्ता 5 ते 7 या गटामध्ये जि प प्रा शा सोनवळा शाळेची विद्यार्थिनी कु स्नेहा सोनेराव पतंगे प्रथम क्रमांक रोख 1501 रुपये सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र द्वितीय क्रमांक चि.अर्जुन संतोष कदम स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर रोख 1001 रुपये सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र तर तृतीय क्रमांक चि स्वराज सोमेश्वर उदावंत संकल्प विद्यालय अंबाजोगाई रोख 701 रुपये सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र तर इयत्ता 8 ते 10 गट मध्ये प्रथम क्रमांक कु तनिष्का जनाबाई बळीराम मुंडे संकल्प विद्यामंदिर रोख 1501रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र द्वितीय क्रमांक कु.कृष्णा संतोष कदम रोख 1001, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र तृतीय क्रमांक प्राप्त कु मायरा मोहम्मद नसीर शेख गोदावरी कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळा व चि श्रेयस सतीश केंद्रे खोलेश्वर विद्यालय अंबाजोगाई यांना प्रत्येकी रोख 701 रुपये सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीते साठी शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष पांडुरंग नरवडे कोषाध्यक्ष साधू गायकवाड सल्लागार उमेश नाईक, संदीप दरवेशवार,अनुरथ बांडे, दीपक बिडवे, बाळासाहेब माने, महेश वेदपाठक यांनी परिश्रम घेतले.